# अमृतातेही पैजा जिंके

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

अमृतातेही पैजा जिंके : ना. सी. फडके

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# ऋणनिर्देश...

डॉ. ए. जे. क्रोनीन हे माझ्या आवडत्या कादंबरीकारांपैकी एक आहेत. 'दि ज्यूडास ट्री' ही त्यांची नवी कादबरी गेल्या वर्षी जूलाय महिन्यात माझ्या हाती आली. ती मला आवडली. क्रोनीन यांच्या लेखनशैलीचे सर्व गुणविशेष या कादंबरीत मला आढळले. परंतु हेच कथानक निराळ्या रीतीनं लिहिल्यास अधिक सुसंगत आणि परिणामकारक होईल आणि ते शोकपर्यवसायी झालं आहे त्याऐवजी आनंदपर्यवसायी करता येईल असं माझ्या मनात आलं.

'दि ज्यूडास ट्री' मधला नायक डेव्हिड हा डॉक्टरीचा अभ्यास करणारा एक तरुण असतो. मेरी नावाच्या एका तरुण मुलीची आणि त्याची ओळख होते. ती वाढत जाते. त्याचं तिच्यावर प्रेम बसतं. परंतु वॉल्टर नावच्या एका तरुणाशी तिचं लग्न व्हायचं ठरलेलं आहे असं त्याला कळल्यावर आपलं प्रेम व्यर्थ आहे अशी समजूत तो घेतो. पण मेरीच त्याच्यावर अनुरक्त होते आणि तिच्या आणि डेव्हिडच्या लग्नाला तिच्या घरातली माणसंही संमती देतात. पण त्याच सुमाराला डेव्हिडला प्ल्यूरिसी होते, आणि त्यानं ताबडतोब समुद्राच्या हवेवर गेलं पाहिजे असा डॉक्टर सल्ला देतात. योगायोगानं कलकत्त्यास निघालेल्या एका बोटीवर त्याला नोकरी मिळते, ती तो पत्करतो. त्याचं आणि मेरीचं लग्न दोन महिन्यांसाठी लांबणीवर पडतं.

कलकत्त्याच्या प्रवासात हॉलब्रुक नावाच्या एका धनाढ्य अमेरिकन व्यापाऱ्याशी डेव्हिडची ओळख होते. या गृहस्थाची डोरी नावाची तरुण मुलगी असते, तिच्या सहवासात डेव्हिड येतो. ती त्याच्या प्रेमात पडते. डेव्हिडनं तिच्याशी लग्न करावं असं तिचा बापही म्हणतो आणि तो डेव्हिडला सांगतो की, तुम्ही माझ्या मुलीशी लग्न केलं तर माझ्या प्रचंड औषधी कारखान्यात तुम्हाला भागीदारी मिळेल. डोरीशी

लग्न करण्याचं डेव्हिड ठरवितो आणि मेरीकडे परत जाण्याऐवजी हॉलब्रुक कुटुंबाबरोबर अमेरिकेला जातो.

डोरीशी लग्न करण्याचा डेव्हिडचा प्रयोग सुखाचा ठरत नाही. त्याला संसारसुख मुळीच मिळत नाही. मात्र हॉलब्रुक यांच्या उद्योगातल्या भागीदारीमुळे तो खूप श्रीमंत होतो आणि त्यांच्या मृत्यूनंतर तर त्यांच्या संपत्तीचा तो मालक होतो.

डोरीच्या मरणानंतर डेव्हिडला फार पश्चात्ताप होऊ लागतो की आपण आपल्या आयुष्याची काय तऱ्हा करून बसलो ! मेरीच्या गावाला परत जावं आणि ती भेटली तर तिच्याजवळ क्षमायाचना करून पूर्वी केलेल्या चुकीचं निराकरण करता आल्यास करावं. त्याचा काय नेम, मेरी अजूनही लग्नावाचून राहिली असेल आणि तशी ती राहिली असेल तर तिच्याशी आपल्याला लग्न करता येईल, अशी देखील कल्पना त्याच्या मनात येऊन जाते... तो अमेरिका सोडून मेरीच्या गावी जातो.

मेरी मृत्युवश झालेली असते. परंतु तिची मुलगी कॅथी त्याला भेटते. ती नर्स झालेली असते. मेरी न भेटल्यामुळे झालेल्या दु:खात डेव्हिडला अशा विचारानं समाधान होतं, की हुबेहूब आईसारखी दिसणारी कॅथी तर आपल्याला भेटली ! आपल्या संपत्तीच्या बळावर तिला सुखी करून आपल्या पूर्वीच्या पापाचं प्रायश्चित्त आपल्याला अंशत: तर घेता येईल !

कॅथीचा सहवास वाढल्यावर डेव्हिडला समजून येतं की आपण तिच्या प्रेमात पडलो आहोत. हळूहळू ती देखील त्याच्या प्रेमात पडते. परंतु विली नावाचा तिचा एक चुलता मिशनरी म्हणून आफ्रिकेत गेलेला असतो. तो आता परत येणार असतो आणि त्याच्याबरोबर आफ्रिकेत जाऊन मिशनचं काम करण्यात आयुष्य घालविण्याचं तिनं ठरविलेलं असतं. हा तिचा निश्चय अगदी अढळ असतो आणि त्यामुळे ती डेव्हिडला सांगते की आपल्या प्रेमातून काही निष्पन्न होणार नाही... तिच्या सहवासात सतत राहिल्यास कालांतरानं तिचं मन पालटेल आणि ती आपल्याशी लग्न करील अशा हिशेबानं डेव्हिड तिच्याबरोबर आफ्रिकेला जाण्याचं ठरवितो.

विली ठरल्याप्रमाणे आफ्रिकेहून येतो. मिशनसाठी फंड जमविण्याकरिता त्याच्या व्याख्यानांचा दौरा ठरलेला असतो. त्या दौऱ्यात कॅथी त्याच्याबरोबर जाते. दौरा आटपल्यानंतर अमुक एका दिवशी विली आणि कॅथी या दोघांनी आफ्रिकेत निघण्यासाठी विमानतळावर जावं आणि त्यांच्या बरोबर जाण्यासाठी डेव्हिडनं त्या दोघांना येऊन मिळावं असा बेत ठरलेला असतो.

विलीचा हा व्याख्यानांचा दौरा चालू असतानाच आफ्रिकेत दंगेधोपे, जाळपोळ सुरू होते. नीग्रो लोकांनी मिशनच्या लोकांवर सुरामारीचे हल्ले केल्याच्याही बातम्या येतात.

फ्रीडा नावाची एक वयस्क जर्मन विधवा डेव्हिडची जुनी मैत्रीण असते. त्याच्याशी लग्न करण्याची तिची फार दिवसांची इच्छा असते. ती त्याला गाठते आणि सांगते की आफ्रिकेत मिशनविरुद्ध असा लोकक्षोभ उसळला असताना तू तिकडे जावंस हा केवळ मूर्खपणा आहे. तो मी तुला करू देणार नाही. तो तिच्याशी वाद घालतो की आता इतकं सारं ठरलेलं आहे, तेव्हा मला गेलंच पाहिजे. माझं कॅथीवर प्रेम आहे. यावर फ्रीडा त्याला सुनावते की, ''तुझं प्रेमदेखील मूर्खपणाचं आहे. तू वयानं केवढा, ती केवढी ! शिवाय ती मिशनरी वृत्तीची. तिच्यापासून तुला संसारसुख काय मिळणार? तू पुष्कळ म्हणशील मूर्खपणा करायचा. पण मी तुला करू देणार नाही. तुझं माझं लग्न व्हावं यातच तुझं खरं सुख आहे आणि माझंही. आणि आपलं लग्न ताबडतोब उरकून घेण्याचं मी ठरविलं आहे. कॅथीबरोबर जाण्याचा तुझा बेत मी अशा प्रकारे मोडून काढणारच.''

डेव्हिड या गोष्टीला कबूल होतो. त्याचं आणि फ्रीडाचं लग्न होतं.

आफ्रिकेतल्या दंग्यांना भयानक स्वरूप आलेलं असतं. विलीचं मिशन जळून खाक झालेलं असतं. म्हणून कॅथीला न घेता विली निघून जातो. कॅथीला आता डेव्हिडकडे परत जावंसं वाटतं. त्याच्या प्रेमाचा स्वीकार करून त्याच्याशी लग्न करण्याचं ती ठरविते.

डेव्हिड आणि फ्रीडा लग्न करून ज्या दिवशी परत आलेली असतात त्या दिवशी रात्री कॅथी डेव्हिडच्या निवासस्थानी येते आणि सांगते, ''आता तुमच्यावाचून मला कुणी उरलेलं नाही. मी तुमची आहे.''

दुर्दैवाच्या या दुष्ट खेळाकडे बघून डेव्हिड हतबुद्धच होऊन जातो. फ्रीडा त्याला शयनमंदिराकडे घालवून देते. आणि मग कॅथीला ती डेव्हिडचं गुप्त रहस्य सांगून टाकते, की तो तुझ्या आईचा प्रियकर होता. तिचा विश्वासघात त्यानं केला होता. आता तुझ्याशी त्याला लग्न करायचं आहे. तुझा घात करायचा आहे. त्या घातापासून तुझं रक्षण मी केलेलं आहे. आजच माझं आणि डेव्हिडचं लग्न झालं.

हे सारं ऐकल्यावर कॅथी जी धावत सुटते ती नदीवर जाते आणि डोहात जीव देते.

दुसऱ्या दिवशी सकाळी 'ज्यूडास' वृक्षावर स्वत:ला टांगून घेऊन डेव्हिड आत्महत्या करतो.

क्रोनीन यांच्या कादंबरीचं कथानक थोडक्यात असं आहे. या कथानकातले कित्येक दुवे मनाला पटत नाहीत. डेव्हिडविषयी वाचकाला सहानुभूती वाटावी असं त्याचं स्वभावचित्रण साधलेलं नाही. त्याची एक एक कृती दुबळेपणाची आणि मूर्खपणाची वाटते. ज्या मेरीशी त्याचं लग्न ठरलं होतं तिच्या मुलीवरच त्यानं प्रेम करावं आणि तिच्याशी लग्न करण्याचं त्यानं ठरवावं, हे फार चमत्कारिक वाटतं. कथानकाचा शोकान्त कृत्रिम वाअतो. क्रोनीन यांच्या कसबी लेखनशैलीमुळे कादंबरी वाचनीय झाल्याचं समाधान वाटतं खरं, परंतु एक चांगला विषय वाया गेला आहे असंही मनात आल्यावाचून राहत नाही. म्हणून क्रोनीन यांच्या कथानकात आणि पात्रांच्या स्वभावदर्शनात मला योग्य वाटेल ते फेरफार करून 'अमृतातेहि पैजासि जिंके !' ही कादंबरी मी लिहिली आहे.

माझा हा प्रयत्न कितीसा साधला आहे ते वाचकांनीच ठरवायचं आहे. क्रोनीनची कादंबरी आणि माझी ही कादंबरी – दोन्ही वाचणाऱ्या वाचकांना क्रोनीनचं किती ऋण मी घेतलं आहे तेही ठरविता येण्यासारखं आहे. त्या ऋणाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणं एवढंच माझं काम आहे !

१५-४-६३ **ना. सी. फडके**

पुणे

# १

मांडवी नदीच्या धक्क्यालगतच्या रुंद हमरस्त्यावरचे हिरवे विद्युद्दीप भक्कन लागले आणि त्याबरोबर मावळत्या सूर्याच्या मंदसर किरणांनी जी सोनेरी मुलायम झिलई बंदराच्या आसपासच्या देखाव्यावर चढविलेली क्षणार्धापूर्वीच दिसली होती, ती एकदम अदृश्य होऊन जिकडे तिकडे हिरवा चंदेरी रंग चमचमू लागला... आणि मग मांडवी हॉटेलच्या प्रवेशद्वारापुढे मोठ्या डौलानं वेगात येऊन एक मोठी ऐटबाज मोटर थांबली ती अशा थाटानं की पाहाणाऱ्याला वाटावं, जी कळ दाबल्यामुळे हिरव्या प्रकाशाचा चंदेरी वर्ख जिकडे तिकडे उधळला गेला, ती दाबल्यामुळे जणू ही भपकेबाज मोटरगाडी कुठून तरी वेगात आली होती आणि थांबत होती.

दिवसाकाळी शेकडो मोटारी हॉटेल मांडवीच्या प्रवेशद्वारापुढे येऊन थांबत असत किंवा थांबलेल्या निघून जात असत. एखादी मोटार येऊन थांबणं म्हणजे प्रवेशद्वारापुढच्या लोकांना काही विशेष घटना वाटण्यासारखी नव्हती. परंतु ही जी गाडी येऊन थांबली तिनं लोकांचं लक्ष वेधून घेतलं. भारी किंमतीची आलिशान गाडी म्हणजे गोव्यातल्या माणसांना दुर्मिळ वाटण्यासारखी गोष्ट नाही. एकाहून एक ऐटबाज इटालियन, फ्रेंच, जपानी गाड्या पणजी शहराच्या रस्त्यावरून इतक्या धावत असतात की त्याबद्दलचं कौतुक बघणाराला उरलेलं नसतं. साधी फोर्ड किंवा शेवरोलेट गाडी दिसली तरच कदाचित रस्त्यातल्या माणसांना आश्चर्य वाटण्याचा संभव असतो. असं असूनही हिरव्या दिव्यांच्या चंदेरी चमचमाटाच्या पायघड्या रस्त्यावर पुरत्या उलगडल्या गेल्या न गेल्या तोच जी गाडी वेगानं येऊन हॉटेल मांडवीपुढे मोठ्या डौलात थबकली, ती दिसल्याबरोबर आसपासची सारी माणसं तिच्याकडे टवकारून

बघू लागली. थांबण्यापूर्वी त्या गाडीचा हॉर्न वाजला तोच मुळी नेहमीहून अगदी निराळा आणि लक्ष वेधून घेणारा होता. 'सा ग', 'सा ग' असे ऊंच स्वरातले पण अति मंजुळ स्वर एखाद्या चर्च ऑर्गनवर कुणी वाजवावेत तसा तो हॉर्न वाजला होता. आणि या आवाजाला साजेशीच ती गाडी आकारानं भव्य आणि अत्यंत डौलदार बांधणीची होती...

साऱ्या लोकांना वाटलं, कुणा मोठ्या महाराजाची किंवा कोट्यधीशाची तर ही गाडी नव्हे !.... गाडीतून बाहेर कोण पडतं ते पाहू या, अशा उत्सुकतेनं साऱ्या लोकांच्या नजरा गाडीकडे लागल्या. हॉटेलचे नोकर धावले. बघे लोकांपैकी जे अधिक धीट होते तेही जवळ जाऊन कोंडाळं करून उभे राहिले.

शोफरनं झटकन खाली उतरून मागचं दार उघडलं. उण्यापुऱ्या उंचीचा, काहीसा दृष्य भासणारा, भारतीय माणूस सहसा असत नाही इतका गोरा, काळा चष्मा चढविल्यामुळे ज्याचे डोळे दिसत नव्हते असा, सुमारे पंचेचाळीस वर्षांचा वाटणारा एक पुरुष गाडीखाली उतरला. त्यानं मान उंच करून हॉटेलची इमारत आणि नावाची पाटी बघितल्यासारखं केलं. नजर वळवून मोठ्या रस्त्यापलीकडचा धक्का आणि त्याच्या पलीकडचं मांडवी नदीचं पाणी पाहिल्यासारखं केलं आणि मग धोतराचा सोगा डाव्या हातात अलगद धरल्यासारखं करून झपाझप पावलं टाकीत तो हॉटेलच्या इमारतीत शिरला. लांब लांब टांगा टाकण्याची त्याची तऱ्हा एखाद्या क्रीडापटूला शोभण्यासारखी होती. परंतु त्याच्या चालण्यात थोडं पोक होतं. मनात कसलीतरी चिंता किंवा कसलं तरी असमाधान वागविणारा माणूस नकळतच वाकून, पोक काढून चालतो तशी त्याची चाल वाटली.

त्याच्या मागोमाग जो माणूस गाडीतून खाली उतरला तो त्याचा नोकर असावा. धावत गाडीजवळ आलेल्या हॉटेलच्या नोकरांना गाडीतल्या सामानाबद्दल सूचना देण्यासाठी त्याची एकच धांदल उडाली आणि या कामात थोडा वेळ गेल्यामुळे तो इमारतीत शिरला तो धावतच.

गाडीतून आणखी कुणीच बाहेर येईना, तेव्हा बघ्या लोकांची निराशा झाली. त्यांची कल्पना होती की येवढी भारी किंमतीची बादशाही गाडी, तेव्हा तिच्यातून एखादी आधुनिक प्रसाधनांनी सजलेली, नखरेल, सुंदर बाई बाहेर पडेल. निराश झालेल्या दोघातिघा इसमांनी 'हात्तेरी !' असा उद्‌गार काढून रस्त्यावर थुंकायला कमी केलं नाही!



काळा चष्मा घातलेला उंच गोरा माणूस काऊंटरपाशी गेला. हॉटेलचा मॅनेजर स्वत: धावत आला. त्यानं अभिवादन केलं, आपल्या खोल्या सुसज्ज तयार आहेत असं इंग्रजीतून अदबीनं सांगितलं, आणि एक मोठी लठ्ठ वही पुढे ठेवून आपल्या खिशात टोचलेलं फाऊंटन पेन काढून पुढे धरलं... चष्मेवाला पुस्तकात लिहू लागला तेव्हा काय काय लिहिलं जातं ते, वही जरी उलटी होती तरी, मॅनेजर सराईत दृष्टीनं बघू लागला.

नाव :– हेमंत खारकर.

काम :– मुशाफरी.

कायमचा पत्ता :– C/o. ग्रिंडले बँक, लंडन.

किती मुक्काम करणार :– अनिश्चित.

धंदा : कारखानदार.

सारे कॉलम भरून झाल्यावर सही करून हेमंतनं मॅनेजरकडे बघितलं आणि किंचित् हसून विचारलं, ''बस्?''

''थँक्यू सर'' असं म्हणून पाठीमागच्या लाकडी बोर्डाच्या हुकाला अडकविलेल्या किल्ल्या काढून घेऊन मॅनेजर काऊंटरच्या बाहेर आला आणि पुढे झुकल्यासारखं करून अत्यंत अदबीनं इंग्रजीत म्हणाला, ''चलावं महाराज.''

हेमंतसाठी रिझर्व केलेल्या खोल्यांचा 'सूट' मॅनेजरनं त्याला दाखविला. कोणत्या ठिकाणी कोणती सोय होती ते सांगितलं. आता ताबडतोब चहा, कॉफी, ड्रिंक काय हवं म्हणून विचारलं. रात्रीच्या जेवणासाठी हॉलमध्ये येता येईल की खोलीतच जेवण करणं आवडेल ते विचारून घेतलं. जेवणासाठी स्पेशल काही हवं काय म्हणून चौकशी केली. केवळ हेमंतच्या तैनातीसाठी म्हणून सिद्ध ठेवलेल्या 'बेरा'कडे बोट दाखविलं, काही हवं नको झाल्यास 'रूम सर्व्हिस' ला फोन करावा म्हणून सूचना केली आणि पुन:पुन्हा 'आपली रजा घेऊ?' असं अदबीनं विचारून मॅनेजर निघून जाऊ लागला... परंतु तितक्यात कसलीशी आठवण झाल्यामुळे तो दारातून वळला आणि म्हणाला, ''माफ करा, एक विचारायचं विसरलो. मॅड्रिगल सिंगर्स नावाची पाश्चात्त्य गायकवादकांची एक पार्टी सध्या इथे आलेली आहे. आपण आज येणार हे कळल्यावरून आपल्यासाठी एक निमंत्रणपत्रिका त्यांनी माझ्याजवळ देऊन ठेवलेली आहे.'' लिफाफ्यात घातलेलं एक जाड कार्ड हेमंताच्या हाती देत त्यानं विचारलं, ''आज रात्री त्यांचा जलसा आहे. त्याला जाणं आवडेल आपल्याला? आपण

विलायतेत राहिलेले, आपण तिकडे गायनवादनाचे, नृत्याचे जलसे ऐकलेले-पाहिलेले, आपल्याला आवड असेल अशा कल्पनेनं...''

''तुमची कल्पना बरोबर आहे.'' सिगारेट शिलगावून उजव्या बाजूच्या खिडकीतून दिसणारं मांडवीचं पात्र बघत हेमंत म्हणाला, ''पाश्चात्त्य संगीताची थोडी आवड आहे मला. परंतु आज रात्री जेवणानंतर कुठं जावंसं वाटणार नाही मला. दिवसभर प्रवास केलाय. शांत झोप घेणंच पसंत करीन मी.''

''जशी आपली मर्जी. मग आता घेऊ मी रजा?'' पुन्हा तो कमर मोडून झुकला आणि गेला.

हेमंतचा नोकर त्याच्या बॅगा उघडून सामान व्यवस्थित ठेवण्याच्या कामाला लागला होता. आता हेमंत आधी स्नान करील अशा कल्पनेनं स्नानानंतर त्याला कोणते कपडे घालणं आवडेल त्याचा अदमास करून, नंतर झोपी जाण्याच्या वेळेस त्याला लागेल तो स्लीपिंग सूट काढून योग्य जागी ठेवण्यात तो गुंतला होता... हेमंतचं त्याच्याकडे लक्ष नव्हतं. तो आपलं काम चोख करील याची त्याला खात्री होती. हेमंत काही वेळ जागच्या जागीच सिगरेट ओढीत उभा राहिला. मग तो खिडकीजवळ गेला. नंतर खिडकीच्या कट्ट्यावर दोन्ही हात टेकून तो बाहेर बघू लागला..

आल्बुकर्कचा भव्य पुतळा दिसत होता. त्याच्यावर दिव्यांचा हिरवा चंदेरी प्रकाश पडून त्याची शोभा बिघडली होती. मोठमोठ्या शहरात थोर व्यक्तींचे मोठाले पुतळे उभारण्याचं तेवढं आम्ही पाश्चात्त्यांपासून शिकलो, परंतु त्या पुतळ्यावर रात्रीच्या वेळेस प्रकाश कसा टाकावा हे मात्र आम्ही शिकलो नाही, असा विचार हेमंतच्या मनात आला... अठरा वर्षांनी तो लंडनहून मुंबईस परत आला होता. पणजीला येण्याची त्याच्या मनाला घाई होती म्हणून तो मुंबईत पुरता दोन दिवसदेखील थांबला नव्हता. परंतु तेवढ्या अवधीत मुंबई शहरातल्या जागोजागच्या पुतळ्यांची रात्री मूर्खपणाच्या प्रकाशयोजनेमुळे कशी विटंबना झाली होती ते त्यानं बघितलं होतं. हिरव्या रंगाच्या वाकड्यातिकड्या प्रकाशामुळे आणि त्या प्रकाशानं निर्माण केलेल्या छायेमुळे आल्बुकर्कच्या पुतळ्याला अगदी हास्यास्पद भेसूर रूप आल्यासारखं हेमंतला वाटलं. त्याची नजर बाजूला वळली.

धक्क्याला फेरीबोट लागलेली होती. समोरच्या 'वेती'च्या तीरावर जाऊ इच्छिणाऱ्या दोन मोठ्या ट्रका आणि दोन मोटारगाड्या 'गराज'मध्ये शिरल्याप्रमाणे



'फेरी'त शिरल्या. मग पादचारी माणसं शिरली. फेरीबोट वेतीच्या धक्क्याकडे निघाली. दूर अंतरावर वेतीच्या धक्क्यावरचे हिरवे मर्क्युरी दिवे दिसत होते. त्या प्रकाशात हलणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या आकृती दिसत होत्या. वेतीच्या किनाऱ्याच्या लांबच लांब पट्टीवरची झाडांची दाट रांग दिसत होती. मधल्या पात्रात मांडवी नदीचं खारं पाणी डोहासारखं भरलेलं होतं. वेतीकडे निघालेली फेरी दूर गेली आणि तिचा आवाज अस्पष्ट झाला त्याच वेळेस वेतीहून पणजीच्या धक्क्याकडे येणारी फेरी स्पष्ट दिसू लागली. तिच्या इंजिनाचा आवाज हवेत घुमू लागला... हेमंतच्या मनात आलं, अठरा वर्षांपूर्वी अशा मोठमोठ्या फेरी बोटी नव्हत्या. अशा ट्रका आणि मोटारी इकडून तिकडे आणि तिकडून इकडे जाऊ येऊ शकत नव्हत्या. नव्हे, इतक्या मोटारगाड्या तरी कुठे होत्या? आणि इतकी माणसं तरी कुठे होती?... हेमंतला आठवण झाली की अठरा वर्षांपूर्वी तो पणजीला आला होता तेव्हा दिवेलागणीनंतरच्या याच घटकेला, याच ठिकाणी उभं राहून त्यानं मांडवीचं हे पात्र पहिल्यांदा बघितलं होतं तेव्हा किती वेगळी दिसली होती ही जागा त्याला ! शांत ! स्तब्ध ! अंग दुमडून स्वस्थ झोपी गेलेल्या माणसासारखी !... अठरा वर्षांच्या अवधीत या स्थळाचा इतका कायापालट होईल असं त्या वेळेस वाटलं तरी होतं काय?... तो स्वत:शी म्हणाला, ''आणि अठरा वर्षांनी मी पुन्हा या ठिकाणी येईन असं तरी मला वाटलं होतं काय? अठरा वर्षांपूर्वी...''

परंतु त्या जुन्या आठवणी काढीत बसण्याची हेमंतची इच्छा नव्हती... तो खिडकीतून आत वळला. तेवढ्यात नोकरानं आपलं सारं काम आटपलं होतं आणि त्याला काही विचारण्यासाठी तो वाटच पाहत असल्याप्रमाणे त्याच्याकडे बघत होता. ''सकाळी गाडी लागणार आहे का? किती वाजताची वर्दी देऊ शोफरला?''... त्याचा तो प्रश्न नीटसा न ऐकल्याप्रमाणे परंतु लगेच समजल्याप्रमाणे हेमंतच्या चेहऱ्याची हालचाल झाली. तो म्हणाला, ''सकाळी गाडी लागणार नाही मला.'' नोकरानं विचारलं, ''बाहेर जाणार नाही कुठे?'' हेमंतनं सांगितलं, ''जाणार आहे, परंतु गाडी घेऊन जाणार नाही. पायीच चालत जाणार आहे.'' नोकरानं विचारलं, ''आता मी जाऊ काय?'' हेमंतनं सांगितलं, ''जा. तुझी आणि शोफरची राहण्याची सोय आऊट हाऊसमध्ये झालेली आहे ना?''... नोकर निघून गेला.

'बेरा'नं स्नानपात्र गरम पाण्यानं भरलेलं असल्याची वर्दी दिली तेव्हा ''अच्छा'' म्हणून हेमंतनं तोंडातली सिगरेट टाकली आणि तो स्नानगृहाकडे गेला... परंतु स्नान